# TYBA Marathi G-3, Semister- 06

## मराठी भाषा विषयक कार्य करणाऱ्या शासकीय संस्था

संपादन : डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेलजाळी
(एम.ए. नेट, सेट, पीएचडी)

### १. राज्य मराठी विकास संस्था

'राज्य मराठी विकास संस्था' ही मराठी भाषेच्या विकासाकरता प्रयत्न करणारी महाराष्ट्र शासनपुरस्कृत संस्था आहे. 'मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास' हे संस्थेचे बोधवाक्य आहे. विविध क्षेत्रात मराठीचा होणारा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा यासाठी प्रयत्नशील राहावे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत. या उद्दिष्टांनुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेण्यात येतात. भाषा व संस्कृती या क्षेत्रांत मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय तसेच अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या साहाय्यानेही काही उपक्रम पार पाडण्यात येतात.

राज्य मराठी विकास संस्थेची मुद्रा ही आकाराने पिंपळपानासारखी असून ती मराठी वर्णमाला वापरून तयार करण्यात आली आहे. या संस्थेचे बोधवाक्य '*मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास*'हे मुद्रेखाली असून, बोधवाक्यच ह्या संस्थेचा पाया आहे. ही मुद्रा प्रसिद्ध सुलेखनकार र. कृ. जोशी ह्यांनी तयार केली आहे.

### संस्थेच्या स्थापनेची पार्श्वभूमी –

महाराष्ट्र शासनाद्वारे दिनांक २५ जून १९७९ रोजी मुंबई येथे ‘महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात व प्रशासनात मराठी भाषेचे स्थान' या विषयावर एक परिषद घेण्यात आली होती. त्या परिषदेत मराठी भाषेसाठी एक राज्यस्तरीय संस्था स्थापण्यात यावी, अशी सूचना करण्यात आली. या सूचनेचा विचार करण्यासाठी

१) अशी संस्था असावी का, आणि

२) असायची तर कशा स्वरूपाची असावी,

याविषयी विस्तृत टिप्पणी करण्यासाठी एक अनौपचारिक अभ्यासगट निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या अभ्यासगटाचे निमंत्रक म्हणून प्रा. वसंत बापट आणि अन्य सदस्य म्हणून प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. वसंत दावतर, डॉ. अशोक केळकर आणि प्रा. मं. वि. राजाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आली. अभ्यासगटाच्या सदस्यांनी एक टिप्पणीवजा आराखडा तयार केला. त्या आराखड्यात सारांशरूपाने पुढील मुद्दे मांडण्यात आले होते.

मराठी भाषा विकासासाठी एका स्वतंत्र राज्यस्तरीय संस्थेची आवश्यकता असून तिला तिचे स्वतंत्र कार्यक्षेत्र असेल. अन्य राज्यांत अशा संस्था आहेत. संस्थेचे नाव ‘राज्य मराठी विकास संस्था' (स्टेट इन्स्टिट्यूट फॉर द डेव्हलपमेंट ऑफ मराठी) असे असावे. संस्था सरकारशी संलग्न परंतु बऱ्याच अंशी स्वायत्त असावी. या संस्थेचे काम विद्वत्सुलभ म्हणजे ‘अकॅडेमिक’ पद्धतीने चालावे. तसे झाल्यास तिने केलेल्या योजनाबद्ध कामांची फळे कालांतराने पण निश्चितपणे चाखावयास मिळतील. दिनांक १ मे १९९२ रोजी राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्यात आली . ‘संस्था नोंदणी अधिनियम, १८६०’ आणि ‘

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५०' यांअन्वये दिनांक २ जानेवारी १९९३ रोजी संस्थेची धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी करण्यात आली.

## उद्दिष्ट्ये

'राज्य मराठी विकास संस्था' मराठी भाषेच्या संवर्धनार्थ काम करते. संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केल्याप्रमाणे संस्थेची प्रमुख उद्दिष्टे याप्रकारे आहेत:

- महाराष्ट्राची व्यवहारभाषा, प्रशासनिक भाषा आणि ज्ञानभाषा या तिन्ही स्तरांवर मराठी भाषेचा सर्वांगीण वापर वाढविण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करणे.
- कृषी, वैद्यक, उद्योग, व्यापार, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे इ.व्यवहारक्षेत्रांत मराठी भाषेचा वापर वाढविण्यासाठी आवश्यक साधनसामग्री विकसित करणे; तसेच भाषेशी संबंधित असलेल्या तंत्रविद्यांचा विकास करणे.
- वेळोवेळी भाषिक पाहणीचे कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून व मराठीच्या विविध व्यवसायक्षेत्रांतील स्थितिगतीचे निरीक्षण करून त्यांचे समाज भाषावैज्ञानिक अहवाल शासनाला सादर करणे.
- शासनव्यवहाराच्या प्रशासन, कायदा, न्याय, जनसंपर्क अशा विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांमध्ये मराठी भाषेचा लोकाभिमुख आणि सुलभ वापर वाढविण्यासाठी भाषिक उपक्रम हाती घेणे व उपकरणे निर्माण करणे.
- शिष्टाचार, औपचारिक भाषाव्यवहार व भावाभिव्यक्ती समृद्ध करण्यासाठी भाषिक नमुने निर्माण करणे व उपलब्ध करणे.

- मराठी भाषेतून नव्या ज्ञानाची निर्मिती होण्यासाठी परिभाषेची घडण, निरनिराळया ज्ञानस्रोतांची उपलब्धी, भाषेचा सृजनशील वापर वाढविणारे कृतिकार्यक्रम यांना प्रोत्साहन देणे.
- बहुजनांच्या बोलीभाषा आणि प्रमाण मराठी यांच्यातील अभिसरण वाढवून त्यांच्या समवर्ती संबंधातून मराठी भाषा अधिकाधिक लोकाभिमुख व समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे.
- लेखनविषयक नियम, वर्णमाला, भाषिक वापराची यांत्रिक उपकरणे, संगणकीय आज्ञावली यांच्या वापरात सुसूत्रता व सुबोधता आणण्यासाठी शासनाला मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध करून देणे. माहिती तंत्रज्ञानविषयक गरजा लक्षात घेऊन मराठीत अनुरूप आज्ञावली विकसित करणे. मराठी भाषेतील माहिती व निधी पाया विस्तृत करणे.

## २. मराठी भाषा संरक्षण व विकास संस्था

मराठी भाषा संरक्षण समिती ही मराठी भाषा संरक्षण व विकास संस्था या नावाने ऑक्टोबर २००० मध्ये नोंदणीकृत झाली. शांताराम दातार हे ह्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. महाराष्ट्रात शासकीय, न्यायालयीन इ. सर्व व्यवहारांत मराठी भाषेचा पूर्णपणे वापर व्हावा, मराठी ही ज्ञानभाषा व्हावी हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. ठाणे जिल्हात कल्याण येथे संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय आहे.

- १९९८ च्या अधिसूचनेप्रमाणे तालुका पातळीवरील न्यायालये व जिल्हा पातळीवरील न्यायालये ह्यांमध्ये पूर्णपणे मराठीतून कामकाज व्हावे
- घटनात्मक तरतूदीप्रमाणे मराठी भाषा ही मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा व्हावी

- महाविद्यालयीन शिक्षणात मराठी भाषा हे शिक्षणाचे एक माध्यम म्हणून उपलब्ध करून देण्यात यावे
- मराठी भाषा ज्ञानभाषा व्हावी

ह्या उद्देशाने विविध उपक्रमांद्वारे संस्था कार्य करत असते.

## ३. राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे, १९९२ रोजी "राज्य मराठी विकास संस्थेची" स्थापना केली. संस्था नोंदणी अधिनियम, १९६० रोजी संस्थेची धर्मादाय आयुक्तांकडे स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी झाल्यावर १ मे, १९९३ पासून संस्थेच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात झाली. संस्थेचे कामकाज तिच्या नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार चालते. महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री हे संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष आणि मा. मंत्री, मराठी भाषा, पदसिध्द उपाध्यक्ष असून मंडळावर एकूण २१ अशासकीय सदस्य कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यालय एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३-महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४००००१ येथे आहे. विविध क्षेत्रात मराठीचा होणारा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा व मराठी भाषेच्या अधिवृध्दीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करण्यासाठी भाषा व संस्कृतीच्या क्षेत्रात मराठी भाषेच्या अभिवृध्दीसाठी काम करणा-या विविध शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या सहाय्याने काही उपक्रम संस्था पार पाडते. राज्य मराठी विकास संस्थेची अधिक माहिती **https://rmvs.marathi.gov.in/** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

## ४. मराठी अभ्यास केंद्र

‘मराठी अभ्यास केंद्र’ हे मराठी भाषा, समाज आणि संस्कृती ह्यांसाठी विधायक चळवळ उभारू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांचे संघटन आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर मराठीला लोकभाषा, व्यवहारभाषा आणि ज्ञानभाषा म्हणून मानाचेस्थान मिळेल असेस्वप्न आपण पाहिले. मराठी माणूस या राज्यातच नव्हे तर जगभर स्वत:च्या कर्तृत्वाचा ठसा उमटवेल अशी आशा बाळगली. मराठी संस्कृतीचा भविष्यकाळ हा तिच्या इतिहासाइतकाच देदीप्यमान असेल असे गर्जत राहिलो. प्रत्यक्षात स्थिती काय आहे ? लोकभाषा, व्यवहारभाषा आणि ज्ञानभाषा म्हणून मराठीमागे पडत आहे. शिक्षणापासून न्यायालयापर्यंत कुठल्याच क्षेत्रांत मराठीला मानाचे स्थान आपण मिळवून देऊ शकलो नाही. देशविदेशात मराठी माणसांनी उत्कर्ष साधलापण हा उत्कर्षमराठी समाजाच्या तळाच्या घटकांपर्यंत अजूनही पोचलेलानाही. समृद्धीचे दरवाजे ज्यांच्यासाठी खुले झालेत, अशांपैकी बहुतेकांना मराठी भाषा, संस्कृतीशी फारसे देणे घेणे राहिलेले नाही. जागतिकीकरणाच्या रेट्यात मातृभाषा वगैरे जुनाट गोष्टींच्या फंदात न पडता व्यक्तिगत उत्कर्षाकडे लक्ष द्यावे अशी भूमिका राज्यकर्ते, नोकरशहा, अभिजनवर्गापैकी अनेकजण आग्रहाने मांडत आहेत. बहुजनसमाज मात्र प्रगतीच्या संधींचा शोध घ्यायचा की आपली भाषा व समाज यांच्याशी निष्ठा राखायची अशा कात्रीत सापडला आहे. आपली भाषा, समाज यांच्याशी बांधिलकी जपणे म्हणजे प्रगतीच्या मार्गापासून लांब राहणे असे चित्र उभे रहात आहे. परिणामी मराठीच्या प्रश्नांवर कोणी आणि कसे लढायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. मराठी अभ्यास केंद्राच्या

पुढाकाराने सुरू झालेली चळवळ हे या कोंडीवरचे उत्तर आहे. अभ्यासातून सिद्ध झालेली विधायक चळवळ हे मराठी अभ्यास केंद्राचेस्वरूप आहे. प्रतिक्रियात्मक आणि प्रतीकात्मक पद्धतींनी आंदोलने चालवून प्रश्न सुटल्यासारखे वाटतील. पण सनदशीर मार्गाने, चिकाटीने केलेल्या पाठपुराव्याची सोबत त्यालानसेल तर हे यश तात्कालिक ठरेल. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मराठीसाठी निर्माण झालेल्या विविध राजकीय चळवळींतून या धोक्याची प्रचिती आपल्याला आलीच आहे. म्हणूनच आता मराठीची चळवळ नव्या पायावर उभी राहायला हवी.

## ५. मराठी अभ्यास परिषद –

मराठी अभ्यास परिषद ही मराठी भाषकांमध्ये भाषिक सजगता निर्माण करणारी संस्था असून ती १९८२ पासून कार्यरत आहे. दर वर्षी नियमितपणे, मराठी भाषेच्या हिताच्या, भाषाविकासाच्या आणि भाषासमृद्धीच्या अनुषंगाने पुरक ठरणाऱ्या कार्यशाळा, व्याख्याने, परिसंवाद, संमेलने, पुरस्कार-वितरण अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करणे किंवा त्यात सहभागी होण्याचे काम संस्था करते. सलील वाघ हे संस्थेचे अध्यक्ष आहेत.

### संस्थेची उद्दिष्ट्ये –

(१) मराठीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रयत्न करणे.

(२) लोकव्यवहारात मराठीचा वापर होण्यासाठी प्रचार करणे.

(३) ज्ञानव्यवहारात मराठीला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.

(४) मराठी भाषकांच्या भाषिक गरजा पूर्ण करणे वगैरे.

### संस्थेचे उपक्रम –

मराठी अभ्यास परिषद ही मराठी भाषकांमध्ये भाषिक सजगता निर्माण करणारी संस्था असून ती १९८२ पासून कार्यरत आहे. दर वर्षी नियमितपणे, मराठी भाषेच्या हिताच्या, भाषाविकासाच्या आणि भाषासमृद्धीच्या अनुषंगाने पुरक ठरणाऱ्या कार्यशाळा, व्याख्याने, परिसंवाद, संमेलने, पुरस्कार-वितरण अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करणे किंवा त्यात सहभागी होण्याचे काम संस्था करते. सलील वाघ हे संस्थेचे अध्यक्ष आहेत.

प्रा. अशोक रा. केळकर, प्रा. प्र. ना. परांजपे यांनी यापूर्वी संस्थेचे अध्यक्षपद भूषवलेले आहे.

'भाषा आणि जीवन' हे भाषाविषयास वाहिलेले त्रैमासिक मराठी अभ्यास परिषद १९८३ पासून नियमितपणे प्रकाशित करते. या त्रैमासिकाला अमेरकेतील महाराष्ट्र फाऊंडेशनचा १९९५ सालचा पुरस्कार मिळाला आहे. या नियतकालिकात भाषाविषयक सैद्धांतिक विचारविमर्श, भाषांतरित साहित्याची चिकित्सा, व भाषा आणि जीवन यांतील अनेकपदरी संबंधांची निरीक्षणे आणि त्यावरील भाष्य असते. अश्या प्रकारे भाषाचिंतनाला वाहिलेले इतक्या प्रदीर्घ काळ प्रकाशित होणारे भारतीय भाषांमधले हे एकमेव भाषाशास्त्रीय नियतकालिक आहे.

## ६. मराठी भाषा आणि विकास संस्था –

मराठी भाषा संरक्षण समिती ही मराठी भाषा संरक्षण व विकास संस्था या नावाने ऑक्टोबर २००० मध्ये नोंदणीकृत झाली. शांताराम दातार हे ह्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. महाराष्ट्रात शासकीय, न्यायालयीन इ. सर्व व्यवहारांत मराठी भाषेचा पूर्णपणे वापर व्हावा, मराठी ही ज्ञानभाषा व्हावी हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. ठाणे जिल्हात कल्याण येथे

संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय आहे. १९९८ च्या अधिसूचनेप्रमाणे तालुका पातळीवरील न्यायालये व जिल्हा पातळीवरील न्यायालये ह्यांमध्ये पूर्णपणे मराठीतून कामकाज व्हावे.

- घटनात्मक तरतूदीप्रमाणे मराठी भाषा ही मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा व्हावी.
- महाविद्यालयीन शिक्षणात मराठी भाषा हे शिक्षणाचे एक माध्यम म्हणून उपलब्ध करून देण्यात यावे.
- मराठी भाषा ज्ञानभाषा व्हावी.

ह्या उद्देशाने विविध उपक्रमांद्वारे संस्था कार्य करत असते.

* * * * *